**न्यायालयीन प्रकरण/तातडीचे**

क्र. पोमसं/१४/६६/न्यायालयीन प्रकरणे हाताळणे/५०४/२०१७ मुंबई, दि. ०७.१०.२०१७

विषय :- न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याबाबत मार्गदर्शक सूचना.
शासनाच्या वतीने प्राधिकृत करण्यात आलेली प्राधिकाऱ्यांनी
अवलंबण्याबाबतची कार्यपध्दती...

****

सोबत महाराष्ट्र शासन, गृह विभागाचे परिपत्रक क्र. न्यायप्र - १५ / १० / २०१७ / विधी कक्ष, दिनांक ११.०९.२०१७ ची प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी जोडण्यात आली आहे.

अ.अ.पटवर्धन

**( अ. अ. पटवर्धन )**
कार्यासन अधिकारी,
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
सर्व अपर पोलीस महासंचालक,
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण व महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर,
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल,
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.

प्रत,

पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहायक (गुन्हे), म. रा., मुंबई
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १४-अ, २१, २२, २३, २४, ३६ व ए.पी.ए. शाखा.

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता:-

पोलीस उपअधीक्षक, संगणक विभाग, म. रा., मुंबई
२/- यांनी सदरचे परिपत्रक महाराष्ट्र पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावे.

Regarding guidelines for handling Court Matters.

(9)

०६ २/१५
13 SEP 2017
१४ ३ ९
13615/17

न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याबाबत मार्गदर्शक सूचना.
शासनाच्या वतीने प्राधिकृत करण्यात आलेल्या प्राधिकाऱ्यांनी अवलंबण्याबाबतची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्र. न्यायप्र-१५/१०/२०१७/विधी कक्ष
गृह विभाग,
२ रा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक-११ सप्टेंबर, २०१७.

महाराष्ट्र शासनाचे गृह विभाग या मार्फत घेण्यात आलेले निर्णय वा काढण्यात आलेले आदेश यांना बरेचदा मा. सर्वोच्च न्यायालय/मा. मुंबई उच्च न्यायालय/ मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यासमोर आव्हान देण्यात येते. अशा काही प्रकरणात शासनातर्फे संबंधित न्यायालयात शासनाची बाजू मांडण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त अथवा पोलीस अधिक्षक यांना शासनाच्यावतीने उपस्थित राहण्यासाठी प्राधिकृत केले जाते. अशा प्रकरणात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात येत आहेत.

(१) (अ) ज्या प्रकरणी या विभागाच्या नियंत्रणाखाली क्षेत्रिय प्राधिकाऱ्याने घेतलेल्या निर्णयास वा काढलेल्या आदेशास आव्हान देण्यात आले असेल, परंतु शासनास देखील नाममात्र प्रतिवादी करण्यात आले असेल त्या प्रकरणी अपर पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त अथवा पोलीस अधिक्षक यांना शासनाच्या वतीने शपथपत्र दाखल करण्यास प्राधिकृत करण्यात येते व त्यास संबंधित सरकारी वकिलाच्या मदतीने शासनाच्या प्रचलित अधिनियम, नियम, धोरण व आदेश यांस अधिन राहून वस्तुस्थिती दर्शक शपथपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात येतात. अशा प्रकरणी वरील प्रमाणे शपथपत्र अविलंब दाखल करण्यात येईल हे संबंधित अपर पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त अथवा पोलीस अधिक्षक यांनी कटाक्षाने पहावे.

Put up on file.

(ब) ज्या प्रकरणी शासनाच्या गृह विभागाने घेतलेल्या निर्णयास वा काढलेल्या आदेशास न्यायालयात आव्हान देण्यात आले असेल आणि अशा प्रकरणी शासनाकडून अपर पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त अथवा पोलीस अधिक्षक यांना शासनाच्या वतीने शपथपत्र दाखल करण्यास प्राधिकृत करण्यात आले असेल तर त्या प्रकरणी प्राधिकृत अधिकाऱ्याने शासनाकडून मंजूर परिच्छेद निहाय अभिप्राय प्राप्त करून त्या आधारे संबंधित सरकारी वकीलाकडून शपथपत्राचा मसुदा तयार करून घ्यावा व विहित मुदतीच्या आत शपथपत्र दाखल करण्याची कार्यवाही प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कटाक्षाने करावी.

(२) प्रत्येक न्यायालयीन प्रकरणात शासनाचे ज्या प्राधिकाऱ्यास प्राधिकृत केले असेल त्या प्राधिकाऱ्याच्या वतीने प्रत्येक सुनावणीस संबंधित वरिष्ठ माहितगार अधिकारी यांनी संबंधित न्यायालयात उपस्थित राहणे अनिवार्य आहे. अशा सुनावणीत संबंधित न्यायालयाने जे लेखी अथवा तोंडी निर्देश दिले असतील त्याबाबतचा अहवाल किंवा सुनावणी झाली नसेल तर त्याबाबतचा अहवाल त्याच दिवशी अथवा जास्तीत जास्त दुसऱ्या दिवशी प्राधिकृत अधिकाऱ्याने शासनास फॅक्स अथवा ई-मेलद्वारे सादर करणे आवश्यक आहे.

(३) एखादया न्यायालयीन प्रकरणात वादीच्या प्रकरणावर शासनाने गुणवत्तेवर विहित कालावधीत निर्णय घेण्याविषयी आदेश पारीत करण्यात आले असतील तर त्याची माहिती त्याच दिवशी अथवा जास्तीत जास्त दुसऱ्या दिवशी फॅक्स अथवा ईमेलद्वारे शासनास कळविण्याची दक्षता घेणे प्राधिकृत अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यांना बंधनकारक राहिल.

(४) ज्या न्यायालयीन प्रकरणात शासनाने वरीलप्रमाणे अपर पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त अथवा पोलीस अधिक्षक यांना प्राधिकृत केले असेल अशा प्रकरणी प्राधिकृत अधिकाऱ्याने विशेष लक्ष ठेवून अशा न्यायालयीन प्रकरणांचा सध्यस्थितीचा वेळोवेळी आढावा घेऊन आवश्यक ते सनियंत्रण करावे व आपण न्यायालयात उपस्थित राहिलो नाही किंवा विहीत वेळेत प्रकरणी शपथपत्र दाखल करण्यात आले नाही या कारणास्तव शासनाविरुध्द निर्णय होण्याची वेळ येणार नाही याची प्राधिकृत अधिकाऱ्याने जातीने दक्षता घ्यावी.

(५) वरील सूचनांचे पालन न झाल्यास विभागीय स्तरावरील अपेक्षित कार्यवाही करण्यास विलंब झाल्यास अशा प्रकरणी संबंधित अधिकारी हे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहतील याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(किशोर भालेराव) 11-09-2017
शासनाचे उप सचिव (विधि)

प्रति,

सर्व सह सचिव / उप सचिव/ अवर सचिव / कक्ष अधिकारी, गृह विभाग, मुंबई
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महासंचालाक, लाचलुचपत विरोधी केंद्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई
महासंचालक व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सर्व अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, कारागृह, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महासमादेशक, गृहरक्षक दल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, परिवहन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, सरकारी अभियोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सचिव, राज्य मानवी हक्क आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सचिव, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई
निवडनस्ती (विधि कक्ष).